# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.10.2025** **वारःगुरुवार**

1. रबी पिकांसाठी किमान हमी भावात तसंच, केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात 3 टक्के वाढ.
2. रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर जैसे थे, जनधन खातेधारकांना इंटरनेट आणि मोबाइल बँकिंग सुविधा मोफत.
3. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा, शंभर वर्षांचा गौरवशाली प्रवास, त्याग, निःस्वार्थ सेवा, राष्ट्रनिर्माण आणि शिस्त यांचा अनोखा संगम असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.
4. राज्यभरात विजयादशमीच्या सणाचा उत्साह. आणि
5. एसटी महामंडळाकडून दिवाळीच्या काळात प्रस्तावित 10 टक्के भाडेवाढ रद्द.

**मंत्रिमंडळ निर्णय**

रबी पिकांसाठी किमान हमी भावात वाढ करण्याला काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीनं मंजुरी दिली. सर्वाधिक वाढ करडईच्या भावात झाली असून आता त्याला 600 रुपये प्रति क्विंटल दर मिळेल. त्याखालोखाल मसुराच्या दरात वाढ झाली आहे. मसुराला 300 रुपये प्रतिक्विंटल भाव मिळेल. गव्हाला प्रतिक्विंटल 60 रुपये तर बाजरीला 170 रुपये दर वाढवून मिळाला आहे. त्यामुळं गव्हाला 2 हजार 425 रुपये प्रति क्विंटल आणि बाजरीला 1 हजार 980 रुपये क्विंटल दर मिळेल. हरभऱ्याला 225 रुपये तर मोहरीला अडीचशे रुपये दरवाढ मिळाली आहे. डाळींच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी विशेष अभियान राबवण्याला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. याकरिता आगामी 6 वर्षांसाठी 11 हजार 440 कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे.

**महागाई भत्ता**

केंद्र सरकारनं सरकारी अधिकारी आणि कर्मचारी तसंच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता 3 टक्क्यांनी वाढवला आहे. यामुळं एकंदर महागाई भत्ता 58 टक्के होईल. 1 जुलैपासून ही वाढ लागू राहील अशी माहिती केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिली. याचा लाभ 49 लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि 68 लाख निवृत्तीवेतनधारकांना होणार आहे. देशात 57 नवीन केंद्रीय विद्यालय सुरू करण्याचा निर्णयही सरकारनं घेतला आहे.

**रेपोदर**

रिझर्व्ह बँकेने रेपो दरात कोणताही बदल न करता तो साडेपाच टक्के ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. जनधन योजनेतल्या खातेधारकांना मोबाइल आणि इंटरनेट बँकिंग सुविधा मोफत उपलब्ध करुन देण्याची घोषणाही रिझर्व्ह बँकेनं केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरण आढावा बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी वार्ताहरांना ही माहिती दिली.

**RSS-पंतप्रधान**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा, शंभर वर्षांचा गौरवशाली प्रवास हा, त्याग, निःस्वार्थ सेवा, राष्ट्रनिर्माण आणि शिस्त यांचा अनोखा संगम आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जन्मशताब्दी समारंभात बोलत होते. मोदी यांनी संघ संस्थापक, डॉक्टर केशव हेडगेवार यांचं स्मरण करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. संकटकाळी मदतीसाठी सर्वप्रथम धावून जाणाऱ्या स्वयंसेवकांबद्दल त्यांनी आदर व्यक्त केला. यावेळी एका विशेष टपाल तिकीटाचं आणि नाण्याचं प्रकाशन पंतप्रधानांच्या हस्ते झालं. केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्रसिंह शेखावत तसंच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे कार्यक्रमाला उपस्थित होते.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक सामाजिक विकास, राष्ट्रीय सेवा, सुरक्षा आणि जनकल्याणाशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये सक्रियरित्या सहभागी असून समाजाला एकसंध ठेवण्याचं मोठं कार्य ते करत आहेत असे गौरवोद्गार दत्तात्रय होसबळे यांनी यावेळी काढले. देशानं आपल्याला काय दिलं हे बघण्यापेक्षा प्रत्येक नागरिकानं जर समाजासाठी आणि राष्ट्रासाठी कार्य केलं तरच आपण समृद्ध राष्ट्राची निर्मिती करू शकू असं प्रतिपादन करताना होसबळे म्हणाले.. .

**भारत के लोगों को भारत के लिए जीना चाहिए और भारत को विश्व के लिए कार्य करना चाहिए इसलिए तैयार करना चाहिए, यह कार्य परिस्थिति के ऊपर निर्भर नहीं है। यह इस देश में जन्म लेने वाले प्रत्येक व्यक्ति का एक कर्तव्य बनता है यह राष्ट्र धर्म है। इस राष्ट्र धर्म को जगाना यही संघ का कार्य है। भारत को विश्वबंद बनाने के लिए हम आगे बढ़े। एक नए भारत का निर्माण करने के सार्थकता अपने जीवन में हमें मिले ऐसे हम भगवान से प्रार्थना करते हैं लेकिन पुरुषार्थ के तौर पर अपने प्रयत्न को हम नहीं छोड़ेंगे इसी नए संकल्प के साथ हम आगे बढ़ेंगे। तेरा वैभव अमर रहे माँ, हम दिन चार रहें ना रहें।**

**<u>महामार्ग मंजूरी</u>**

नागपूर ते चंद्रपूर या 204 किलोमीटर लांबीच्या चारपदरी सिमेंट काँक्रीट महामार्गाला मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीनं मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्या अध्यक्षतेखाली काल या समितीच्या बैठकी हा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पासाठी अंदाजे अडीच हजार कोटी रुपये खर्च येणार आहे.

**<u>सेवा पर्व-नक्षलमुक्त भारत</u>**

सेवा आणि सुशासन या मंत्रानं प्रेरित केंद्र सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली परिवर्तन आणि प्रगती करत आहे. या अनुषंगानं सेवा पर्व या मालिकेत आज ऐकूया नक्षलमुक्त भारत याबद्दल....

**गेल्या अकरा वर्षांमध्ये केंद्र सरकारनं नक्षलवाद सहन न करण्याचं धोरण राबवलं. सरकारी योजना 100 टक्के लागू करण्याद्वारे नक्षलवादग्रस्त भागांमध्ये पूर्ण विकास करण्याचं नियोजन आहे. पंतप्रधान मोदी यांनी स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात बोलताना सांगितलं की एकेकाळी नक्षलवाद आणि माओवादामुळं लाल पट्टा म्हणून ओळखले जाणारे प्रदेश आता हरित विकासाचे पट्टे बनत आहेत...**

**नक्षलग्रस्त भागातील कायदा आणि सुव्यवस्था लागू करुन हिंसाचार समाप्त करणं आणि वर्षानुवर्ष राहिलेल्या प्रगतीमधील दरी भरुन काढणं या दोन महत्वाच्या उद्दिष्टांवर सरकार काम करत आहे. त्याकरिता अंदाजपत्रकी तरतूद 300 टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आली आहे. गेल्या दहा वर्षात नक्षली हिंसाचाराच्या घटनांमध्ये 53 टक्के घट झाली आहे. पुढील वर्षी 31 मार्चपर्यंत नक्षलवाद समूळ नष्ट करण्याचं ध्येय सरकारनं ठेवलं आहे. ही सातत्यपूर्ण राजकीय इच्छाशक्ति आणि प्रशासनिक वचनबद्धता यांच्यामुळं नक्षलमुक्त भारताचा संकल्प पूर्ण होण्याच्या अधिकच समीप आला आहे.**

**<u>सण</u>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. यानिमित्त देशभरात आज अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासीयांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण अधर्मावर धर्माच्या विजयाचं प्रतीक असून सत्य आणि न्यायाच्या मार्गावर चालण्याची एक प्रेरणा असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

विजयादशमीचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, समाधान आणि संपन्नता घेऊन येवो अशा शुभेच्छा राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिल्या आहेत. विजयादशमीच्या दिवशी शारदीय नवरात्रौत्सवाचं उत्थापन होऊन सीमोल्लंघन केलं जातं. रावण दहनालाही या दिवशी विशेष महत्व आहे.

नागपूर इथं रेशीमबागेत सरसंघचालक मोहन भागवत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मेळाव्याला आज संबोधित करणार आहेत. याप्रसंगी आयोजित विशेष कार्यक्रमासाठी माजी राष्ट्रपती डॉक्टर रामनाथ कोविंद उपस्थित असणार आहेत.

या निमित्तानं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा मुंबईत शिवाजी पार्क इथं होत आहे तर शिवसेनेचा दसरा मेळावा मुंबईत गोरेगाव इथं नेस्को मैदानावर होणार आहे.

**<u>आकाशवाणी वर्धापन दिन</u>**

आकाशवाणी पुणे केंद्राचा आज 72 वा वर्धापन दिन आहे. 2 ऑक्टोबर 1953 रोजी स्थापन झालेल्या या केंद्राने बातम्या, सांस्कृतिक कार्यक्रम, नाटक, संगीत आदि माध्यमातून श्रोत्यांवर अमीट ठसा उमटवला आहे.

**<u>धम्मचक्र</u>**

नागपूरच्या दीक्षाभूमीत एकोणसत्तराव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आज मुख्य सोहळा होणार आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी काल दीक्षाभूमीवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाला अभिवादन केलं. स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या हस्ते काल दीक्षाभूमी परिसरातील मुख्य सोहळ्याच्या ठिकाणी पंचशील ध्वजारोहण करण्यात आलं.

**एसटी दरवाढ रद्द**

राज्यात अलिकडं झालेल्या पूर परिस्थितीमुळं दिवाळी दरम्यान एसटीनं केलेली 10% हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यानुसार ही दरवाढ रद्द करण्यात येत असल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

**बीएसएनएल**

भारत संचार निगम लिमिटेडच्या 25 व्या वर्धापन दिनानिमित्त काल पुण्यातील बीएसएनएल पीजीएम कार्यालयात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. बीएसएनएल महिला संघटनेच्यावतीनं 'आपलं घर' या अनाथाश्रमाला अन्नधान्याचं वाटप करण्यात आलं. वृक्षारोपण आणि आरोग्य तपासणीचंही आयोजन करण्यात आलं होतं.

**क्रिकेट**

भारत आणि वेस्टइंडिज यांच्यात दोन सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेला आजपासून अहमदाबाद इथं सुरुवात होत आहे.

**हवामान**

कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.